# मिरा भाईंदर महानगरपालिका

## आयुक्त कार्यालय

मुख्यालय, 2रा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी commissioner@mbmc.gov.in


जा.क्र. मनपा/ आयुक्त / 25 /2026-27 दि. 25/05/2026

**आदेश**

**विषय:**- मिरा भाईंदर शहरातील मालमत्तांचे GIS आधारित सर्वेक्षण तसेच त्यांचे BPMS व नळ कनेक्शन सोबत मॅपिंग व इंटीग्रेशन आणि महापालिकेच्या इतर मालमत्तांचे UPIC (Unique Property Indentification Code) सह Geo-sequencing बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये मालमत्ता कर महसूल वाढविणे, महसूल संकलन प्रक्रिया अधिक कार्यक्षम करणे तसेच नागरिकांना अधिक प्रभावी, पारदर्शक व सुलभ सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी GIS आधारित मालमत्ता सर्वेक्षण, BPMS व नळ कनेक्शन मॅपिंगचे एकत्रिकरण, UPIC (Unique Property Indentification Code) प्रणाली तसेच Geo-sequencing प्रणाली विकसित करण्याची बाब विचाराधीन आहे.

सदर उपक्रमामार्फत डिजीटल गव्हर्नन्स मजबूत करणे, कर आधार शुध्दीकरण, डेटा मानकीकरण (Standardization) Revenue Analytics तसेच विभागीय समन्वय सुधारणा करणे अपेक्षित आहे.

त्या अनुषंगाने आवश्यक प्रकल्प, प्रणालीगत सुधारणा व तांत्रिक उपाययोजना याबाबत शिफारसी करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकारी | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| 1. | आयुक्त | अध्यक्ष |
| 2. | अतिरिक्त आयुक्त (माहिती व तंत्रज्ञान) | सदस्य |
| 3. | अतिरिक्त आयुक्त (मालमत्ता कर) | सदस्य |
| 4. | मुख्य लेखापरीक्षक | सदस्य |
| 5. | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | सदस्य |
| 6. | शहर अभियंता | सदस्य |
| 7. | सहा. संचालक, नगररचना | सदस्य |
| 8. | उपायुक्त (मालमत्ता कर) | सदस्य |
| 9. | सिस्टीम मॅनेजर | सदस्य |
| 10. | सहा. आयुक्त (मालमत्ता कर) | सदस्य सचिव |

**समितीची उद्दीष्टे:-**

1. मालमत्ता कर महसूल वाढविणे व महसूल संकलन प्रक्रिया अधिक कार्यक्षम करणे.
2. GIS आधारित एकात्मिक मालमत्ता डेटाबेस विकसित करणे.
3. BPMS, मालमत्ता कर, नळ कनेक्शन व इतर प्रणालींचे Integration करणे.

4. सर्व मालमत्तांना UPIC प्रदान करुन Geo-sequencing प्रणाली विकसित करणे.
5. डिजीटल गव्हर्नन्स व Revenue Analytics मजबूत करणे.
6. नागरिक सेवा अधिक पारदर्शक, सुलभ व तंत्रज्ञानाधारित करणे.
7. आवश्यक प्रकल्प व प्रणालीलगत सुधारणा राबविण्यासाठी शिफारसी सादर करणे.

**<u>समितीचे कार्यकक्षा</u>:-**

1. GIS Mapping, UPIC, BPMS Integration, Water Connection Mapping व Revenue Analytics संदर्भातील बाबींचा अभ्यास करणे.
2. कर आधार शुध्दीकरण, वापरातील बदल, कर आकारणी व महसूल वृध्दीसाठी आवश्यक उपाययोजना सुचविणे.
3. विविध विभागांतील डेटा Integration, digitization व Standardization संदर्भातील कार्यपध्दती निश्चित करणे.
4. डिजीटल गव्हर्नन्स व नागरिक सेवा सुधारणा यासाठी आवश्यक प्रणालीगत बदल सुचविणे.
5. आवश्यकतेनुसार संबंधित विभाग, संस्था किंवा तांत्रिक सल्लागार यांच्याशी समन्वय साधणे.
6. प्रकल्पांची टप्प्याटप्प्याने (Phase-wise/Pilot Basis) अंमलबजावणी करण्याबाबत रोडमॅप तयार करणे.
7. महसूल वृध्दी व नागरिक सेवा सुधारणा यासाठी आवश्यक प्रकल्प व तांत्रिक उपाययोजनांबाबत शिफारसी सादर करणे.

**<u>शिफारसींसह अहवाल</u>:-**

1. समितीमार्फत वेळोवळी बैठका घेऊन कार्यवाहीचा आढावा घेण्यात यावा.
2. समितीने आपल्या अभ्यासानंतर आवश्यक शिफारसी, कृती आराखडा (Action Plan), प्राधान्यक्रम व अंमलबजावणी संदर्भातील अहवाल आयुक्तांना सादर करावा.
3. तसेच समितीमार्फत मासिक प्रगती अहवाल सादर करण्यात यावा व आवश्यकतेनुसार प्रकल्प टप्प्याटप्प्याने (Phase-wise/Pilot Basis) राबविण्याबाबत शिफारसी करण्यात याव्यात.

सदर आदेश तात्काळ प्रभावाने लागू राहील.

**(राधाबिनोद अ. शर्मा,** भा.प्र.से.)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रति,**
समिती अध्यक्ष/सदस्य/सदस्य सचिव

प्रत:-
1. मा. महापौर यांचे स्विय सहाय्यक
2. मा. उप-महापौर यांचे स्विय सहाय्यक
3. मा. सभापती, स्थायी समिती यांचे स्विय सहाय्यक
4. मा. पदाधिकारी (सर्व)